लोकमत

# आळे महाविद्यालय, क्विक हिल फाउंडेशन सामंजस्य

लोकमत न्यूज नेटवर्क

आळेफाटा : आळे येथील बाळासाहेब जाधव महाविद्यालयाचे संगणकशास्त्र विभागात क्विक हिल फाउंडेशन व महाराष्ट्र सायबर विभाग यांच्या वतीने कमवा व शिका योजनेचा प्रारंभ करण्यात आला. याबाबत सामंजस्य करार करण्यात आला.

क्विक हिल फाउंडेशनच्या गायत्री पवार व क्षितिजा शिर्के यांनी 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' विषयावर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देत त्यातील वीस विद्यार्थ्यांची निवड केली. तर निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी सायबर जागरूकता अभियानात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन काम करण्याचे आवाहन प्राचार्य प्रवीण जाधव यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष अजय कुऱ्हाडे, उपाध्यक्ष सौरभ डोके, सचिव अर्जुन पाडेकर, खजिनदार अरुण हुलवळे, संचालक बाळासाहेब जाधव, किशोर कुऱ्हाडे, भाऊशेठ कुऱ्हाडे, बबन सहाणे, उल्हास सहाणे, बाबूशेठ कुऱ्हाडे, शिवाजी गुंजाळ, जीवन शिंदे, दिनेश सहाणे, कैलास शेळके, प्रदीप गुंजाळ, देविदास पाडेकर, सम्राट कुऱ्हाडे, रमेश कुऱ्हाडे, शांताराम कुऱ्हाडे, विभाग प्रमुख प्रा. नूतन जोशी यांनी फाउंडेशनच्या या उपक्रमाचे कौतुक करत महाविद्यालयाची निवड केल्याबद्दल आभार मानले.